निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०७/२०२०/२०२१/३२ दिनांक-२२.०१.२०२१

माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक :१७.०३.२०२०
जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक:अप्राप्त
प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक :२४.१२.२०२०
प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक :२२.०१.२०२१

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०७/२०२०**

**अपीलकर्ता:** श्री. विकास शिवाजी सोनावणे

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक १७.०३.२०२० रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत अर्ज केला. त्यानुसार प्रतिवादी यांनी माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक २४.१२.२०२० रोजी वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २८.१२.२०२० रोजी नोटिस पाठवून दिनांक २२.०१.२०२१ रोजी सुनावणी आयोजीत करून सुनावणी घेतली. सुनावणीच्या वेळी माहिती अधिकारी व अपिलार्थी हे दोन्ही हजर होते. दिनांक २८.१२.२०२० रोजीच्या अपिलार्थी यांना पाठविलेल्या सूनावणीच्या नोटीसमध्ये प्रथम अपील दाखल दिरंगाईची कारणे लेखी अथवा मौखिक स्वरूपात सादर करण्यास सुचना देण्यात आल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी पुढील प्रमाणे छापील दस्तऐवज प्रथम अपिलीय




१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

अधिकारी यांच्या समोर सादर केले- Citation Supreme Court of India "Suo Motu Writ Petition (Civil) No(s). 3/2020, Cognizance For Extension of Limitation, dated-23.03.2020" तसेच सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी आपले मौखिक निवेदन सादर केले.

**३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुददे खालील प्रमाणे आहेत -**

**<u>मागितलेली माहिती:-</u>**

१) मा.वि.नि.आ. कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा हजेरीपटाचा अंतिम अहवाल सांक्षाकित प्रतीमध्ये मिळावा.

२) सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या रजेविषयक संपूर्ण माहिती साक्षांकित प्रतीमध्ये विहीत नियमात मिळावी.

**<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>**

माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

**<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>**

१) दिनांक १७.०३.२०२० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत उपरोक्त माहितीची मागणी केली. परंतु संबंधित विभागाने आजतागायत माहिती दिलेली नाही.

**<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-</u>**

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अधिकाराच्या अर्जात मागीतलेली माहिती हि जनमाहिती अधिकारी यांनी पुरवीलेली नाही.

१) अपीलाची प्रथम सुनावणी अपील दिरंगाईने दाखल करणे यावर झाली.

२) अपील दाखल करण्याची दिरंगाई एकूण ०७ महिने ०९ दिवस आहे. अपिलार्थी यांनी दिरंगाईची कारणे समाधानकारकपणे नमूद केलेले नाही.

३) अपिलार्थी यांनी कोविड-१९ मुळे मी अपील दिरंगाईने केल्याचे सांगितले. तसेच सुप्रिम कोर्टाचे दिनांक २३.०३.२०२० रोजीचे लिमिटेशन वरील आदेश सादर केले.

४) प्रतिवादी यांनी सुध्दा कोविड-१९ मुळे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही असे सुनावणी दरम्यान मौखिक सांगितले.

५) सदरहू नमूद मौखिक उत्तरे अपिलार्थी व प्रतिवादी यांची योग्य व समाधानकारक नाहीत. आयोगाचे कार्यालय कोविड-१९ कालावधीत सुरु होते तसेच अपील ही हस्तपोच दाखल करण्यात आलेली आहे. प्रतिवादी हे माहिती पोस्टाद्वारे उपलब्ध करून देवू शकत होते, परंतू त्यांनी माहिती दिलेली नाही. अपिलार्थी आणि प्रतिवादी यांची उत्तरे समाधानकारक नाहीत. माहिती अधिकार कायदाच्या कलम-१९ अंतर्गत पहिल्या परंतूकानुसार अपिलार्थीला अपील दाखल करण्यास काय प्रतिबंधीत कारणे होती ती विस्तृतपणे नमूद नाहीत आणि ०७ महिने ०९ दिवसाच्या प्रदिर्घ कालावधी नंतर अपिल दाखल केले आहे. करिता कलम-१९ च्या नुसार-

*"१९. अपील-*

*(१) जिला कलम ७ च्या पोट-कलम (१) मध्ये किंवा पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत निर्णय प्राप्त झालेला नाही, किंवा जी केंद्रीय शासकिय माहिती अधिकाऱ्याच्या, किंवा यथास्थित, राज्य शासकिय अधिकाऱ्याच्या निर्णयामुळे व्यथित झाली आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा कालावधी समाप्त झाल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, प्रत्येक शासकीय प्राधिकरणामध्ये जो अधिकारी, केंद्रीय शासकीय माहिती अधिकाऱ्याच्या, किंवा अधिकाऱ्याकडे अपील करू शकेल;*

*परंतु, जर अशा अधिकाऱ्याची, अपीलकारास वाजवी कारणामुळे वेळेत अपील दाखल करण्यास प्रतिबंध झाला होता अशी त्याची खात्री पटली तर, त्याला तीस दिवासांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर अपील दाखल करून घेता येईल."*

***(19.Appeal-***

*(1) Any person who, does not receive a decision within the time specified in sub-section (1) or clause (a) of sub-section (3) of section 7, or is aggrieved by a decision of the Central Public Information Officer or the State Public Information Officer, as the case may be, may within thirty days from the expiry of such period or from the receipt of such a decision prefer an appeal to such officer who is senor in rank to the Central Public Information Officer or the State Public Information Officer, as the case may be, in each public authority.*

*Provided that such officer may admit the Appeal after the expiry of the period of thirty days if he or she is satisfied that the Appellant was prevented by sufficient cause from filing the Appeal in time.)*

अपिलार्थी व प्रतिवादी यांनी नमूद केलेल्या मौखिक निवेदनावरून तसेच कलम-१९ अंतर्गत व अपिलातील मुद्यावरून सदरहू अपील हि पूर्णत: दिरंगाई वर सुनावणी घेवून, अपीलाच्या गुणवत्तेवर न करता अपिलार्थी व प्रतिवादी यांचे निवेदन तसेच माहिती अधिकाराच्या कायदा अंतर्गत वरिल अपील दिरंगाईने दाखल केल्यामुळे तसेच वाजवी व समाधानकारक दिरंगाई क्षमापित करता येवू शकत नाही, करिता अपील खारिज करून निकाली काढण्यात येत आहे.

अपिलार्थी यांना जर माहिती पाहिजे असल्यास त्यांना पून:श्च नव्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज करता येवू शकतो. प्रतिवादी श्री. प्रदिप मोहरे, जन माहिती अधिकारी यांना अशी ताकीद देण्यात येत आहे की, त्यांनी माहिती अधिकारांची सर्व प्रकरणे ३० दिवसाच्या मुदतित निकाली काढावी, जर तसे न झाल्यास वरिल प्रकारची प्रकरणे वरिष्ठ अधिकारी यांच्या निर्दशनास आणून त्यावर योग्य ती शास्ती/कार्यवाही करण्यास प्रस्तावित करण्यात येईल.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपील खारिज करण्यात येत आहे.

22/01/2021

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. विकास शिवाजी सोनावणे,
बि.नं.७, रुम नं. ११०३,
शासकिय वसाहत,
बांद्रा पूर्व, मुंबई-४०० ०५१.
मो.नं.८४२२९९९१०४.

22/01/2021

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**